# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## इ क्षेत्रीय कार्यालय
## सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्र.१७)

दिनांक : ०५/०३/२०२१ वेळ: सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची माहे मार्च समिक सभा दिनांक ०५/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे "संत ज्ञानेश्वर महाराज" सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/ नगरसदस्या उपस्थित होते.

१) मा.डोळस विकास हरिश्चंद्र - सभापती
२) मा.गोफणे अनुराधा देविदास - सदस्या

या शिवाय श्री.राजेश आगळे - क्षेत्रीय अधिकारी, श्री.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, श्री.प्रविण घोडे- कार्यकारी अभियंता विद्युत, श्री.बाळू लांडे- उपअभियंता विद्युत, श्री.दिनेश फाटक, श्री.सुदर्शन वहीकर-उपअभियंता पा.पु., श्री. व्हि. के. वाईकर –उपअभियंता जलनि:सारण, श्री.कातोरे पी.बी.-कनिष्ठ अभियंता विद्युत, श्री.कुलकर्णी आर.पी.-कनिष्ठ अभियंता पाणीपुरवठा, श्रीम.शेख जे.मी.-मुख्याध्यापक मा.विद्यालय भोसरी, श्री.भिसे डी.एम-क्रिडा पर्यवेक्षक, श्री.संदिप गायकवाड-उद्यान सहाय्यक इत्यादी अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

प्रशासन अधिकारी: सभा कामकाज भारविणेकामी आवश्यक गणसंख्या नसलेने सभा तहकुब करण्यात यावी.
सभापती: सदस्यांचे विषय दाखल करण्यात येऊन आजची सभा तहकुब करण्यात येत आहे. शासनांचे सुचनेनुसार सभेची पुढील तारीख निश्चित करण्यात येऊन सभा घेण्यात येईल.

विषय: क्र.१ मा.सुवर्णाताई बुर्डे यांचा विषय.
मौजे डुडुळगाव येथील गट नं. २३१ व २३२ मधून १८.०० मी. विकास आराखड्यातील रस्त्यापासून ते केळगाव पुल यांना जोडणारा १८ मी. रुंद रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१३ कलम २०५ अन्वये घोषित करणेबाबत.

विषय क्र.२ मा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे यांचा विषय
लांडेवाडी अग्निशामक केंद्राजवळील सार्वजनिक मुतारी निष्कसीत करणेबाबत.

(विकास डोळस)
सभापती
इ प्रभाग समिती

जा.क्र.इक्षेका/ स्विस/ ३७ /२०२१
दिनांक : १० /०८ /२०२१

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय
**सभावृत्तांत (कार्यपत्रिका क्र.१७)**
(दिनांक ०५/०३/२०२१ ची तहकुब सभा)

दिनांक : १३/०८/२०२१ वेळ: सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची माहे मार्च ची दि.०५/०३/२०२१ रोजी तहकुब करणेत आलेली मसिक सभा दिनांक १३/०८/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता "इ" क्षेत्रीय कर्यालयातील **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य/ नगरसदस्या सभागृहात व काही online उपस्थित होते.

१) मा.डोळस विकास हरिश्चंद्र - सभापती
२) मा.बुर्डे सुवर्णा विकास - सदस्या
३) मा.लक्ष्मणशेठ सोपान नस्ते - सदस्य
४) मा.सागर बाळासाहेब गवळी - सदस्य
५) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सदस्या

या शिवाय श्री.राजेश आगळे - क्षेत्रीय अधिकारी, श्री.देवन्ना गट्टूवार-कार्यकारी अभियंता स्थापत्य, श्री. माणिक चव्हाण- कार्यकारी अभियंताविद्युत, श्रीम.लता बाबर-उप अभियंता विद्युत, श्री.सुनिल पाटील-उपअभियंता स्थापत्य, श्री.एल.बी.जाधव--उपअभियंता स्थापत्य, श्री.वैभव पुमाळकर -उपअभियंता स्थापत्य क्रिडा, श्री.नाना मोरे- प्रशासन अधिकारी, श्री.वसंत उगले-लेखाधिकारी, श्री.राजेश भाट-सहा.आरोगध्याधिकारी, श्री.सुदर्शन वहीकर-उपअभियंता पा.पु., श्री.एल.बी.जाधव-उपअभियंता स्थापत्य, श्री.गुंडाळ सी.आर.- कनिष्ठ अभियंता स्थापत्य इत्यादी अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते.

मा.सभापती यांनी उपस्थित सन्मा.नगरसदस्य/ नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करून सभा सूरू करणेस अनुमती दिली.

अ) दिनांक ०५/०२/२०२१ रोजी तहकुब करणेत आलेल्या व दिनांक १६/०२/२०२१ रोजी घेणेत आलेल्या माहे फुब्रुवारी २०२१ चे मासिक सभेचा सभवृत्तांत (कार्यपत्रिका क्र.१५) कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक १६/०२/२०२१ रोजी घेणेत आलेल्या अंदाजपत्रकाचे सभेचा सभवृत्तांत (कार्यपत्रिका क्र.१६) कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ६० | विषय क्रमांक | : | ०१ |
| दिनांक | : | १३/०८/२०२१ | विभाग | : | प्रशासन |
| सुचक | : | मा. सागर गवळी | अनुमोदक | : | मा. सोनाली गव्हाणे |

संदर्भ माक्षेत्रीय अधिकारी यांचेकडील क्र.श्रीभैवा/७/कावि/१२/२०२१ दि.२२/०२/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या श्री. भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय भोसरी करीता महाराष्ट्र शासनाचा "ब" दर्जा प्राप्त असुन त्यांना अनुदान प्राप्त होत असल्याने दर वर्षी पुस्तके/ग्रंथ खरेदी करणे आवश्यक आहे. वाचकांच्या व सभासदांच्या आवडीनुसार कथा, कादंबरी-, ललित, ऐतिहासिक, विनोदी, आरोग्य, काव्य, धार्मिक, विषयाच्या २०७ पुस्तकांची "इ" क्षेत्रीय कार्यालया मार्फत श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालयाकरीता पुस्तक खरेदीकामी कोटेशन नोटीस क्र .१ जा.क्र.भैसावा /कावि/०८/२१ ,दि.२९/०१/२०२१ अन्वये प्रसिध्द करून दरपत्रक मागविले असता खालील ४ पुरवठा धारकांकडुन कोटेशन प्राप्त झाले असून ते दिनांक १०/०२/२०२१ रोजी सकाळी सदरची सर्व कोटेशन उघडण्यात आले असता खालील दर दिसून आले आहेत.

| अ.क्र. | पुरवठाधारकाचे नाव | शॉप ॲक्ट लायसन्स | पॅन कार्ड | जी.एस.टी . रजि. | आयकर रिटर्न | दिलेली सुट |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | करण बुक सर्व्हिस पुणे | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ६ % |
| २ | कुणाल एजन्सी पुणे | ✓ | ✓ | ✓ | ✓ | ८ % |
| ३ | कल्पना बुक डीलर्स पुणे | ✓ | ✓ | ✓ | ✓ | १२ % |
| ४ | शुभम साहित्य पुणे | ✓ | ✓ | ✓ | ✓ | १५ % |

वरिल तक्त्यानुसार शुभम साहित्य अप्पा बळवंत चौक पुणे यांनी१५ % सुट दिल्याने इकडील दिनांक १२/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये अजून किती सुट देऊ शकता असे कळविले असता शुभम साहित्य अप्पा बळवंत चौक पुणे यांनी पुस्तकाचे छापिल किमतीवर जास्तीत जास्त २१ % सुट देण्याचे मान्य केले आहे .त्यानुसार वरील तक्त्यातील पुरवठाधारका पैकी शुभम साहित्य अप्पा बळवंत चौक पुणे यांचेकडुन जास्तीत जास्त २१ % सुट मिळाल्याने अटी व शर्ती नुसार श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय भोसरी या शासन अनुदान प्राप्त वाचनालयाकरिता २०७ पुस्तके थेट पध्दतीने खरेदी करणे कामी अंदाजे ५६,००० -/इतका खरेदी खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च "पुस्तके व नियतकालिके खरेदी " या लेखाशिर्षातून अदा करण्यात येणार आहेत.

शुभम साहित्य, अप्पा बळवंत चौक पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या लघुत्तम दराप्रमाणे श्री भैरवनाथ सार्वजनिक वाचनालय, भोसरी करीता २०७ पुस्तके थेट पध्दतीने खरेदी करणे कामी अंदाजे ५६,०००) -/अक्षरी र.रु .छपन्न हजार फक्त (च्या एकूण किमतीवर २१ % सुट देवून प्रत्यक्ष येणा-या किमतीची पुस्तके खरेदीसाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : ६२ | विषय क्रमांक | : | ०२ |
| दिनांक | : १३/०८/२०२१ | विभाग | : | नगर रचना |
| सुचक | : मा. सुवर्णा बुर्डे | अनुमोदक | : | मा. सागर गवळी |

संदर्भ मा. सुवर्णा बुर्डे यांचा प्रस्ताव
मा.सभापती यांनी शिफारस केले प्रमाणे

मौजे डुडुळगाव येथील केळगाव-डुडुळगाव हद्दीवरील इंद्रायणी नदीवरील सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पुल बांधणेत आलेला आहे. सदर पुलावर डुडुळगाव हद्दी मधून जाणे येणे करिता रस्ता उपलब्ध नाही. तसेच मौजे डुडुळगाव हद्दीमधील गट नं. २३१ व २३२ मधून पूर्व पश्चिम १८.०० मी. मंजूर विकास आराखड्यात रस्ता प्रस्तावित आहे. गट नं. २३१ , २३२ मधून केळगाव पुलाकडे जाणारा दक्षिण-उत्तर १८ मी. रुंद रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१३ कलम २०५ अन्वये

घोषित केल्यास डुडुळगाव हद्दी मधून केळगाव पुलावरून जाणे येणे करिता रस्ता उपलब्ध होत असलेने सदर रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०१३ कलम २०५ अन्वये घोषित करणेस तसेच त्यासाठी आवश्यक वैधानिक कार्यवाही पुर्ण करणेसाठी मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ठराव क्रमांक | : | ६३ | विषय क्रमांक | : | ०३ |
| दिनांक | : | १३/०८/२०२१ | विभाग | : | स्थापत्य/ आरोग्य |
| सुचक | : | मा. सोनाली गव्हाण | अनुमोदक | : | मा.सागर गवळी |

संदर्भ मा. सोनाली गव्हाणे यांचा प्रस्ताव
मा.सभापती यांनी शिफारस केले प्रमाणे

लांडेवाडी अग्निशामक केंद्राजवळ सार्वजनिक मुतारी असून सदर ठिकाणी मुस्लीम समाजाचे धर्मिक केंद्र आहे. त्यामुळे सदर ठिकाणी अतिशय मोठया स्वरूपात दुर्गंधीचा व अस्वच्छता असल्याने नागरीकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागते. नागरीकांचे मागणीनुसार सदरची मुतारी निष्कासीत करण्याची कार्यवाही तातडीने करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला.

यानंतर उपस्थितांचे आभार व्यक्त करून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

Vkaldola

(विकास डोळस)
सभापती
इ प्रभाग समिती

जा.क्र.इक्षेका/ स्विस/३८ /२०२१
दिनांक : ३१ / ०८/२०२१

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
इ प्रभाग समिती

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

२-/सभावृत्तांतातील ठरावानुसार आपले विभागाशी संबंधित विषयाबाबत योग्य ती नियमाधिन कार्यवाही करणेत यावी. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.